बुधवार, दि १५ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक ७ वा ● किंमत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# गुटखा माफियाला अभय देणाऱ्या पोलिसांना 'शांततेचा जागतिक पुरस्कार'!




**दीपक शेळके**

**जालना** - जालना जिल्ह्यातील गुटखा माफियांच्या संरक्षणार्थ अहोरात्र कार्यरत असलेल्या काही पोलिसांना यंदाचा शांततेचा जागतिक पुरस्कार जाहीर झाला आहे. कारण त्यांनी गेल्या काही वर्षांत इतक्या शांततेने आणि समजुतीने काम केले की गुटखा विक्रेते आज जिल्ह्यात निर्भय वातावरणात व्यापार करत आहेत.

जालना पोलिसांनी गुटखा माफियांसोबत निर्माण केलेली अतूट मैत्री आणि समंजसता पाहून आंतरराष्ट्रीय संस्थांनी कौतुक केले आहे.

गुटखा कारवाई झाली तरी, काही तासांत सर्व शांत!, गुन्हा नोंदवला जातो, पण नावं नाही!, माल पकडला जातो, पण मालक नाही!

ही अद्भुत कौशल्यपूर्ण हातोटी पाहून जागतिक पुरस्कार समितीने त्यांना गुटखा शांती मिशन म्हणून गौरविले आहे.

स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार, या पोलिसांनी गुटखा माफियांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याऐवजी त्यांच्या सुरक्षिततेवर लक्ष केंद्रित केले, ही बाब पुरस्कार समितीच्या लक्षात आली. सकाळी धाड, पण रात्रीपर्यंत गुन्हा नाही - एवढ्या संयमाने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना जगभरातून दाद मिळाली आहे. त्यामुळे जालना जिल्हा आता 'गुटखा शांती झोन' म्हणून ओळखला जाईल, अशी चर्चा आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील गुटखा बादशाह सतीश उर्फ लाला यांनी पोलिसांना शुभेच्छा दिल्या असून म्हटले आहे, आमच्या गुटखा उद्योगाला प्रशासनाने ज्या शांततेने सहकार्य केले, त्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. जालना हे राज्यातील 'गुटखा-शांती मॉडेल' बनावे ही आमची प्रार्थना!

या पुरस्काराचा वितरण सोहळा कदीम जालना पोलीस ठाण्याच्या मागील गल्लीमध्ये पार पडणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान 'गुप्त संरक्षक समितीचे प्रमुख अधिकारी' भूषवणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून 'गुटखा उत्पादक संघटनेचे मानद सचिव' उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमानंतर उपस्थितांना 'सौजन्याने' सुगंधित पान मसाला वाटप करण्यात येईल. दरम्यान, शहरातील नागरिकांनी या पुरस्काराला जोरदार प्रतिसाद दिला आहे. सामाजिक माध्यमांवर NoBellForGutkha हा हॅशटॅग ट्रेंड होत असून, काहींनी तर व्यंगचित्रांद्वारे पोलीस दलाचे अभिनंदन केले आहे. मात्र जिल्हा पोलिसांनी यावर मौन बाळगले असून, आम्ही शांततेसाठी वचनबद्ध आहोत, म्हणूनच शांत आहोत. एवढेच उत्तर दिले आहे. जिथे कायदा झोपतो तिथेच असे शांततेचे जागतिक पुरस्कार जन्म घेतो! जालना जागतिक दर्जाचे शांततामय शहर बनले आहे.

# काँग्रेसला मिळाले नवे बळ

## अब्दुल रशीद यांच्या प्रवेशाने जालना काँग्रेसमध्ये चैतन्य



**मुंबई । जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यातील राजकारणात एक नवे समीकरण आकार घेत असून, दोन वेळा नगरसेवक आणि माजी नगर परिषद सभापती अब्दुल रशीद यांनी १३ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) या पक्षाचा राजीनामा देऊन भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्या या प्रवेशामुळे जालना काँग्रेसमध्ये गेल्या काही वर्षांपासून जाणवणारी पोकळी भरून निघणार असल्याचे राजकीय वर्तुळात स्पष्ट दिसत आहे.

माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी काँग्रेस सोडून भाजपात प्रवेश केल्यानंतर स्थानिक काँग्रेस संघटनेला नेतृत्वाच्या बाबतीत मोठा धक्का बसला होता. पक्षाचे कार्यकर्ते, विशेषतः शहरातील अल्पसंख्याक आणि मध्यमवर्गीय मतदारवर्ग अस्वस्थ झाला होता. मात्र, अब्दुल रशीद यांच्या काँग्रेस प्रवेशामुळे ही अस्थिरता आता कमी होणार आहे. रशीद हे सामाजिक कार्य, संघटनशक्ती आणि कार्यकर्त्यांमधील लोकप्रियतेमुळे परिचित आहेत.

अब्दुल रशीद यांनी २०१४ च्या जालना विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी मिळवली होती. ते अल्प मतांनी पराभूत झाले असले तरी त्यांचा प्रभाव आणि संघटन कौशल्य तेव्हाच अधोरेखित झाले होते. शहरातील अनेक सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा उपक्रमांमध्ये त्यांचा सातत्यपूर्ण सहभाग राहिला आहे.

काँग्रेसमध्ये प्रवेश घेतल्यानंतर रशीद यांनी म्हटले, काँग्रेस ही भारताच्या स्वातंत्र्याचा आणि सामाजिक न्यायाचा आत्मा आहे. या पक्षाशी जोडले गेल्यानंतर मी मागासवर्गीय, दलित, महिला, अल्पसंख्याक, युवक आणि शेतकरी यांच्या हक्कांसाठी अधिक जोरकसपणे लढणार आहे.

त्यांचा प्रवेश महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेससाठी मोठा टर्निंग पॉईंट मानला जातो. शहरातील अल्पसंख्याक मतदार आणि पारंपरिक काँग्रेस कार्यकर्त्यांना एकत्र आणण्याची क्षमता त्यांच्यात आहे, अशी चर्चा आहे.

मुंबईतील दादर येथील महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात त्यांनी काँग्रेस सदस्यत्व स्वीकारले. या वेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय सरचिटणीस रमेश चेन्निथला,

**पान ३ वर**



## संपादकीय

# ‘गुटखा-जाळे’ची सावली पुन्हा जालना पोलिसांवर!

जालन्यातील खरपुडी रोडवरील गोकुळवाडी परिसरात झालेल्या अलीकडील गुटखा कारवाईने पुन्हा एकदा गुटखा-माफिया सतीश उर्फ लाला याचे नाव चर्चेत आणले आहे. कारवाई सकाळी झाली, पण रात्रीपर्यंत गुन्हा दाखल न झाल्याने शहरात प्रश्न निर्माण झाला - हा केवळ प्रशासकीय विलंब होता की कुणाला वाचवण्याचा ‘मॅनेज’ प्रयत्न? जप्त झालेल्या गुटख्याची किंमत तब्बल तीन ते साडेतीन लाख रुपये असल्याचे सांगितले जाते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर साहित्य सापडल्यावरही पोलिसांकडून अद्याप अधिकृत प्रेस नोट जारी न होणे हीच संशयाची ठिणगी आहे. त्याच दिवशी कदीम जालना पोलीस ठाण्यात देखील तत्सम कारवाई झाल्याची चर्चा झाली; परंतु नंतर ते ‘मसाला’ असल्याचे सांगण्यात आले. हा फक्त योगायोग म्हणायचा की गोंधळ निर्माण करण्याची ‘स्क्रिप्टेड’ योजना होती? या सगळ्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या ‘मॅनेज कारभाराचा’ वास आता तीव्र झाला आहे. अंबड येथील साडेसहा लाखांचा गुटखा प्रकरण अद्याप विसरले गेलेले नाही. त्यावेळीही सतीश उर्फ लाला याचे नाव प्रथम एफआयआरमधून गायब होते, पण चौकशीत नंतर समोर आले. त्यानंतरही अशीच पद्धत पुन्हा दिसतेय - म्हणजेच व्यवस्थेत कुठेतरी गाठ आहे, जी दरवेळी आरोपीला वाचवते. दर महिन्याला पोलिस विविध भागांत गुटखा जप्त करतात, पण त्या मागील साखळी तशीच अबाधित राहते. कोठून माल येतो, कुठे साठवला जातो, कोण पोलीस ठाण्यातील कोण अधिकारी दुर्लक्ष करतो - याचा शास्त्रशुद्ध मागोवा कोणी घेत नाही. हे केवळ आरोग्याचे नाही, तर व्यवस्थेच्या प्रामाणिकतेचे संकट बनले आहे. गुटखा हा केवळ व्यसनाचा नव्हे तर भ्रष्टाचाराचा विषय बनला आहे. शासनाने बंदी घातली, पण बंदीखालील व्यापार मात्र वाढतोय. गुटखा विक्री, जप्ती, आणि ‘मॅनेज’ या त्रिकोणातून निर्माण झालेल्या भ्रष्ट जाळ्याने पोलिसांची विश्वासार्हता गमावण्यास सुरुवात केली आहे. आता हे थांबवण्याची जबाबदारी थेट जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक यांच्यावर येते. कारण जर हे जाळे तोडले गेले नाही, तर जालना जिल्हा गुटखा-माफियांच्या ताब्यात जाण्यास वेळ लागणार नाही. हा केवळ एका गुटख्याचा प्रश्न नाही - हा प्रशासनाच्या सुसंस्कृततेचा आणि सार्वजनिक विश्वासाचा कसोटीचा क्षण आहे. गुटख्याने तरुण पिढीचे आरोग्य नष्ट केले; आता ‘मॅनेज कारभाराने’ व्यवस्थेचे नैतिक आरोग्य गिळंकृत करू नये, एवढेच!

# वाचन ही अनभिज्ञ कला असल्याचे डॉ. अब्दुल कलाम यांनी समाजाला पटवून दिले

देशात अनेक उत्सव व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने व थाटामाटात साजरे केले जातात.परंतु आजच्या अत्याधुनिक व सोशल मिडियाच्या युगात करोडो लोक दिवसेंदिवस वाचनापासुन दुरावतांना दिसत आहे. त्यामुळे देशाच्या प्रत्येक नागरिकांच्या मनात वाचनाची प्रेरणा जागृत व्हावी या उद्देशाने महान वैज्ञानिक (सायंटिस्ट),भारताचे माजी राष्ट्रपती, मिसाईल मॅन,(पद्मभूषण, पद्मविभूषण, भारतरत्न) पुरस्कार प्राप्त, देशाचे अनेक उच्च पद भुषविनारे महाज्ञानी व महान विचारवंत आणि सर्वांच्या काळजात घर करून बसणारे डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन दिवस साजरा केला जातो. ए.पी.जे.अब्दुल कलाम याचा जन्म १५ आक्टोंबर १९३१ला तामिळनाडू येथे झाला ते भारताचे अकरावे राष्ट्रपती होते. त्यांच संपूर्ण जीवन अभ्यासु वृत्तीचे असल्याने देशाच्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या व युवकांच्या हृदयात एक वेगळीच छाप सोडली आहे. त्यामुळे युवावर्गाचे लाडके पुरूष म्हणून सुध्दा ख्याती आहे. ए.पी.जे.अब्दुल कलाम शिक्षणाच्या दृष्टीकोणातुन सर्वांचेच मसीहा (देवता) बनले.त्यामुळे वाचन किती महत्त्वाचे आहे हे अब्दुल कलाम यांच्या व्यक्तिमत्त्वावरून दिसून येते. वाचन दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी लिहिलेल्या संपूर्ण पुस्तकांचे वाचन केलेच पाहिजे.यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त खरी श्रद्धांजली ठरेल व वाचकांमध्ये खरी सकारात्मकता, जागृगता व उत्साहाचे वातावरण दिसून येईल आणि नवीन ऊर्जा निर्माण होवून सर्वांना चांगला मार्ग मिळेल.आजची युवा पिढी ज्या जलद गतीने मोबाईलचा वापर करीत आहेत त्याच गतीने वाचन व्हायला हवे.वाचनामुळे बरंच काही अवगत करता येते हे आपल्या पुर्वजांनी दाखवून दिले आहे. वाचनामधुन मिळालेले ज्ञान आजच्या युवकांना अवश्य शिखरावर पोहचवेल यात तिळमात्र शंका नाही.आपण आज ज्याप्रमाणे मोबाईला घट्ट धरून बसतो तेही घातकच आहे. मोबाईल खेळावा, मोबाईलवर काम करावे.परंतु वाजवीपेक्षा जास्त मोबाईलचा वापर केला तर ते अवश्य नुकसानदायक आणि घातक ठरेल आणि ठरत आहे यातही तिळमात्र शंका नाही. परंतु वाचनाच्या बाबतीत तसे नाही आपण वाचनाला जितका जास्त वेळ द्याल त्यांच्या दुप्पट ज्ञानामध्ये भर पडेल, बुध्दीला चालना मिळेल आणि वाचनातील ज्ञान हे अनंत काळापर्यंत आपल्या हृदयात राहील.त्यामुळे आपण जे काही वाचन केले आहे ते ज्ञान समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी आपण सहज मदत करू शकतो. आज मोबाईलचा विचार केला तर त्याची रेकॉर्ड ब्रेक निर्यात झाल्याचे सांगितले जाते. भारताच्या चालू वित्तीय वर्षात मोबाईल फोनची निर्यात १० अरब डॉलरच्या जवळपास झाली आहे. म्हणजेच ५० हजार करोड रूपयांची निर्यात.याच्या तुलनेत पुस्तकांची निर्यात अल्पशी दिसून येते.म्हणजेच मोबाईलच्या तुलनेत देशातील लोकांचे वाचन दिवसेंदिवस कमी कमी होत असल्याचे यावरून स्पष्ट दिसून येते.देशाचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा १५ आक्टोंबर हा जन्म दिवस देशातील शाळा, महाविद्यालयांमध्ये वाचन प्रेरणा दिन म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.परंतु वाचनाची प्रेरणा ही फक्त शाळा किंवा महाविद्यालयापुर्ती सीमीत नसावी; तर देशाच्या १४० कोटी जनतेच्या नसानसात जायला हवी. कारण यामुळे मुलांवर चांगले संस्कार होतील व वाचनाची गती वाढेल व ज्ञानाचे फळ आपल्या कुटुंबीयांना अवश्य मिळेल. वाचन काय आहे हे जर कोणाला जानुण घ्यायचेच असेल तर डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी लिहिलेल्या किमान एका पुस्तकाचे तरी वाचन करावे. भारतील संस्कृती अनभिज्ञ आहे भारतात सर्वंच धर्माचे, पंथाचे,जातीचे लोक रहातात.त्यामुळे प्रत्येक धर्मानुसार वेगवेगळे सण उत्सव साजरा होतांना आपण पहातो अशा उत्सवाच्या निमित्ताने मित्रांना, बहीणीला, भावाला किंवा अन्य कोणाला आपण भेट वस्तू देतोच अशा परिस्थितीत आपणाला काय भेट वस्तू द्यायची ती अवश्य द्यावी याचा विरोध नाही.परंतु यात एका पुस्तकाची भर अवश्य टाकली पाहिजे.यामुळे वाचनाला सर्वच स्तरातून प्रेरणा मिळेल असे मला वाटते.आपण पहातो देशात प्रत्येक घरामध्ये लहान- मोठ्यांचा वाढदिवस साजरा करण्यात येतो अशा परिस्थितीत भेट वस्तू म्हणून पुस्तके अवश्य भेट द्यायला हवी यामुळे बुध्दीचा विकास अवश्य होईल.कारण डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी वाचन आणि लेखन यातुनच उंच भरारीमारून मोठे शिखर गाठले आहे हे सर्वांनाच ग्यात आहे.आपण त्यांच्या प्रत्येक कार्याचे अनुकरण करने गरजेचे आहे ही त्यांच्या जयंती निमित्त खरी श्रद्धांजली ठरेल.देशातील विद्यार्थी व युवा वर्गाने सोशल मीडियाचा अवश्य वापर करावा. परंतु वाचनामध्ये कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याचीही दक्षता घ्यावी व वाचन नियमित ठेवावे. आपण वाचनाचा विचार केला तर देशात ऋषी-मुनी, ज्ञानी, विचारवंत,थोरपुरूष, क्रांतिकारक, वैज्ञानिक, डॉक्टर,शास्त्रज्ञ,बुध्दीजीवी हे संपूर्ण पुस्तकी वाचनातुनच निर्माण झालेले वटवृक्ष आहेत. त्यामुळे वाचनाची परंपरा अनंत काळापासून आहे आणि आता ही साबुत ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी युवा वर्गावर आहे .ही जबाबदारी युवा पिढी व विद्यार्थी अवश्य पार पाडेल याची मला खात्री आहे.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन अवश्य व्हायला हवे सोबतच याच दिवशी शाळा, महाविद्यालयांतील शिक्षक-विद्यार्थीनी वृक्ष लागवड करून एक आगळा वेगळा संदेश संपूर्ण भारतात कलाम यांच्या जयंती निमित्त गेला पाहिजे असे मला वाटते.ज्यांना पुस्तकी वाचन अवघड वाटत असेल त्यांनी दररोज वृत्तत्रांचे वाचन केलेच पाहिजे यामुळे देश -विदेशातील घडामोडींची माहिती अवगत होईल व हळूहळू पुस्तक वाचनाकडे आपली वाटचाल वाढेल.माजी राष्ट्रपती एक.पी.जे.अब्दुल कलाम यांना जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार, मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

### पानसरे हत्याप्रकरणी निष्पाप हिंदुत्वनिष्ठ डॉ. तावडे, अमोल काळे व शरद कळसकर यांना जामीन!

# निरपराध हिंदुत्वनिष्ठांची साडे नऊ वर्षांची भरपाई कोण करणार? सनातन संस्थेचा सवाल

**कोल्हापूर -** कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणात हिंदुत्वनिष्ठ डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, श्री. अमोल काळे आणि श्री. शरद कळसकर यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने जामीन मंजूर केला आहे. न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांनी दिलेल्या या निर्णयामुळे तब्बल ९ वर्षे ६ महिन्यांच्या प्रदीर्घ न्यायालयीन लढ्यानंतर डॉ. तावडे यांच्या सुटकेचा मार्ग मोकळा झाला आहे.

या पार्श्वभूमीवर सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक म्हणाले, ‘‘यापूर्वी कोल्हापूर बार कौन्सिलने बचाव पक्षाला वकील देण्यास नकार देणे आणि आता पुरोगाम्यांनी जामीन रद्द करण्यासाठी दबाव आणणे, एकूणच पुरोगामी अन्‍ कम्युनिस्टांच्या ‘दबावगटां’मुळे निरपराधांचे आयुष्य कसे उद्ध्वस्त केले जाते. एका ‘गोल्ड मेडलिस्ट’ ईएनटी सर्जन डॉक्टरला ९ वर्षे तुरुंगात राहावे लागते, हे याचे हृदयद्रावक उदाहरण आहे. या सर्वांच्या आयुष्यातील वाया गेलेल्या मौल्यवान वर्षांची भरपाई कोण करणार?’’ असा प्रश्न उपस्थित केला. ‘‘दीपावलीच्या पूर्वसंध्येला हिंदु समाजाला आनंदवार्ता मिळाली. नुकतेच मालेगाव प्रकरणातील हिंदुत्वनिष्ठांची निर्दोष मुक्तता झाली, आता पानसरे प्रकरणातूनही सर्व हिंदुत्वनिष्ठांना जामीन मिळाला. त्यामुळे खऱ्या अर्थाने यंदा हिंदुत्वनिष्ठांची दिवाळी साजरी होईल’’, असेही श्री. वर्तक म्हणाले.

श्री. वर्तक यांनी या प्रकरणातील घटनाक्रमावर बोट ठेवत सांगितले की, ‘जानेवारी २०१८ मध्ये पानसरे प्रकरणात कोल्हापूर सत्र न्यायालयाने डॉ. तावडे यांना जामीन दिला होता; परंतु दाभोलकर प्रकरणात ते कारागृहात असल्याने त्यांची सुटका झाली नाही. १० मे २०२४ रोजी दाभोलकर प्रकरणात ते निर्दोष सुटताच, पानसरे कुटुंबीय आणि कम्युनिस्ट शक्तींनी जामीन रद्द करण्यासाठी मोहीम चालवली. पुढे नंतर जामीन रद्द झाल्याने त्यांना पुन्हा कारागृहात जावे लागले. आता उच्च न्यायालयाच्या निर्णयाने अखेर त्यांना न्याय मिळाला आहे.’

मुंबई उच्च न्यायालयात बचाव पक्षाच्या वतीने ज्येष्ठ अधिवक्ता नितीन प्रधान, तर कोल्हापूर येथील खंडपिठामध्ये हिंदु विधीज्ञ परिषदेचे अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर आणि अधिवक्ता सिद्धविद्या यांनी युक्तिवाद केला. त्यात सरकारी साक्षीदार सागर लाखे यांची साक्ष हत्येनंतर साडेतीन वर्षांनी नोंदवली गेली. २०१८ मध्ये जामीन मिळाल्यानंतर सरकारी पक्षाने उच्च न्यायालयात केलेले अपील २०२३ मध्ये स्वतःहून मागे घेतले होते. तसेच याच प्रकरणातील इतर ६ संशयित आरोपींना जामीन मिळाल्याने समान न्यायाच्या तत्त्वावर अन्य आरोपींना जामीन मिळावा, असा युक्तीवाद करण्यात आला. याच सुनावणीत निष्पाप असलेले अन्य हिंदुत्वनिष्ठ श्री. अमोल काळे आणि श्री. शरद कळसकर यांच्या वतीने माजी न्यायमूर्ती व अधिवक्ता पुष्पा गनेडीवाला यांनी प्रभावी युक्तिवाद केला. या सर्व अधिवक्त्यांनी दिलेल्या यशस्वी लढ्याबद्दल सनातन संस्था समस्त हिंदु समाजाच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करते.

‘‘उशिरा मिळालेला न्याय हा अन्यायच असतो,’ हे न्यायालयाचे तत्त्व डॉ. तावडे, श्री. काळे आणि श्री. कळसकर यांच्या बाबतीत तंतोतंत लागू होते. ज्यांनी न्यायप्रक्रियेत अडथळा आणून हा विलंब घडवला, त्या शक्तींवर कारवाई झाली पाहिजे. या न्यायालयीन लढ्याला जामीनामुळे अर्धे यश मिळाले, ईश्वराच्या कृपेने या सर्वांची लवकरच निर्दोष मुक्तता होऊन संपूर्ण यश मिळेल, अशी आमची न्यायदेवतेवर श्रद्धा आहे’’ असेही श्री. वर्तक यांनी म्हटले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

## सरन्यायाधिश गवई हल्ला प्रकरणाचा संविधान जनजागृती संघातर्फे निषेध



**जालना । प्रतिनिधी -** सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणाचा जालना येथील संविधान जनजागृती संघाने निषेध नोंदवत हल्लेखोर वकीलाविरोधात राष्ट्रदोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणीही केली आहे.

संविधान जनजागृती संघाच्या पदाधिकाऱ्यांनी आज ( दि. १४) निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांची भेट घेऊन त्यांच्या हस्ते राष्ट्रपतींना निवेदन सादर करण्यात आले. या शिष्टमंडळात अध्यक्ष दादाराव हिवराळे,सचिव प्रकाश गडवे,सदानंद टवले,उपाध्यक्ष कृष्णराव ढगे, सहसचिव केशव पगारे,ईश्वर भालेराव, भीमराव पैठणे,प्रा.शांताराम रायपुरे,देविदास बिन्हाडे, रामदास गवई, माधवराव सरवाडीकर, महाजन सोनकांबळे, अंकुश दांडगे, बी. एम. चव्हाण, एम. एन. पात्रे, सुभाष साळवे ,देविदास बिन्हाडे आदींचा समावेश होता. भारताच्या सर्वो च्च न्यायालयाचे सर न्यायाधिश भूषण गवई यांच्यावर दि. ६ ऑक्टोबर रोजी भर कोर्टात न्यायदान करतांना हल्ला करण्यात आला, हा देशाच्या लोकशाही न्यायव्यावस्थेवर व संविधानावर हल्ला असून राकेश किशोर तिवारी याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## १५ ऑक्टोबरला पोलीस पाटील पदासाठी मुलाखती

**जालना -** जिल्ह्यातील जालना, बदनापूर उपविभागातील एकूण १८५ पोलीस पाटील पदासाठी लेखी परीक्षा दि. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी संपन्न झाली. लेखी परीक्षेचा निकाल दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी भरती प्रक्रियेचे अधिकृत संकेतस्थळ jalnapp.recruitonline.in वर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तरी लेखी परीक्षेत उत्तीर्ण ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दि. १५ ऑक्टोबर २०२५ सकाळी ८ वाजेपासून सुरू होणार आहेत. मुलाखतीचे सविस्तर वेळापत्रक आणि वेळ अधिकृत संकेतस्थळ recruitonline.in वर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. मुलाखतीसाठी वेळेवर उपस्थि रहावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी, जालना यांनी केले आहे.

## ओबीसीचा डीएनए आहे असे म्हणणाऱ्या दगाबाजांना ओबीसी धक्का न लावता ओबीसी ओबीसीलाच मतदान करणार - प्रा. लक्ष्मण हाके

**परतूर । प्रतिनिधी -** उपविभागीय कार्यालय येथे ओबीसी भटके विमुक्त महासंघाच्या वतीने २ सप्टेंबर २०२५ च्या मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देण्याच्या निषेधार्थ शासनाच्या विरोधात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक लक्ष्मण हाके सर बोलत होते. परतुर येथे रेल्वे स्टेशन पासून ते तहसील कार्यालय पर्यंत या मोर्चाचे आयोजन करण्यात आलेले होते.मंडल आयोगाच्या माध्यमातून सामाजिक मागासपण दूर करण्यासाठी देशातील मागास जातींना प्रतिनिधित्व मिळावे म्हणून इतर म ागासवर्ग प्रवर्गात आरक्षणाची तरतूद झाली. बारा बलुतेदार १८ आलोतेदार यांना सामाजिक प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे व त्यांना माणूस म्हणून जगता आले पाहिजे हा या आरक्षणाचा मुख्य उद्देश यातून कुठेतरी या बलुतेदारांचे प्रतिनिधी शिक्षण, नोकऱ्या आणि राजकारणात प्रतिनिधित्व करू लागले पण २ सप्टेंबर २०२५ च्या शासन आदेशानुसार मूळ ओबीसीची चे अस्तित्व शासनाने धोक्यात आणले आहे. त्या अनुषंगाने सरकारने जरी आरक्षण धोक्यात आणले असले तरी परंतु उद्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत एससी, एसटी यांना या आरक्षण मध्ये घटकांना सोबत घेऊन सर्वसाधारण च्या जागावर सुद्धा निवडणूक लढवेल व दोन सप्टेंबर २०२५ चा शासन निर्णय म्हणजे मूळ ओबीसी प्रवर्गासाठी काळा कायदा आहे. अशा प्रकारचे वक्तव्य प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी केले आहे. याप्रसंगी ओबीसी नेते नवनाथ आबा वाघमारे,



श्रीमती सविताताई मुंडे प्राध्यापक विठ्ठल तळेकर बट्टळे मामा यांनीही मार्गदर्शन केले याप्रसंगी करवंडे परमेश्वर खरात अशोकराव गाव सौंदर्य मधुकर झरेकर भागवत कडपे परमेश्वर पोटे सुभाष जाधव डॉक्टर त्रिभुवन नामदेव नाचन शेख जम ीर परमेश्वर ढवळे तुकाराम जईद बाळू गाते राधाकिसन माने रुस्तुमराव कुंड माऊली हजारे सुनील पोटे सिद्धार्थ पोटे गोरख गोटे अमोल आगळे, बाबासाहेब झरेकर बाळ आनंद गाढवे अभिमन्यू गाढवे ओम प्रकाश गाढवे गणेश आंबेकर सुदर्शन राऊत शिवाजीराव इंगळे इतर ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे संयोजक रामप्रसाद थोरात यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परमेश्वर पोटे यांनी केले शासनाच्या वतीने उपविभागीय अधिकारी, पद्माकर गायकवाड यांनी निवेदन स्वीकारले.

## गुरुवारी जैन श्रावक संघ आणि लायन्स क्लब, जालना यांच्याकडून मोफट नेत्र तपासणी शिबिर!

**जालना । प्रतिनिधी -** अम ोलक मानस, तपज्योत्स्ना प.पू. श्री हिमानीजी एम.एस. यांच्या ४६ व्या वाढदिवसानिमित्त १६ ऑक्टोबर २०२५ गुरुवार रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत श्री.व्ही.जैन श्रावक संघ आणि लायन्स क्लब ऑफ जालना, गोल्ड, रॅपिड आणि अन्नपूर्णा यांच्या संयुक्त विद्यमाने छ. शिवाजी महाराज चौकातील श्री गुरु गणेश नगर (तपोधाम) येथे मोफत मोती बिंदू आणि नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रात्रीच्या वेळी, नेत्रतज्ज्ञ डॉक्टर रुग्णांना मोती बिंदू आणि नेत्र तपसणी करून मार्गदर्शन करतील आणि ज्यांना शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे त्यांच्यासाठी (मोफत ऑपरेशन) व्यवस्था केली जाईल आणि ते शस्त्रक्रियेशी संबंधित सल्ला देतील जेणेकरून गरजूंना जास्तीत जास्त फायदा मिळू शकेल. या शिबीराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवांहन जैन श्रावक संघाचे अध्यक्ष श्री. सुदेशकुमार सकलेचा, तसेच विजय बगाडिया, पुरुषोत्तम जयपूरिया, नरेंद्र मोदी, अशोक मिश्रा, लॉ. प्रेमलता मोदी, जैन श्रावक संघाचे महामंत्री धरमचंद गदिया, तसेच श्री संजय मुथा, श्री नेमीचंद रुणवाल, प्रकल्पाचे अध्यक्ष लॉ. शांतीलाल काथेड यांनी केले आहे.

पान १ वरुन

### काँग्रेसला मिळाले ...

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार डॉ. कल्याण काळे, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रीय सचिव बी. एम. संदीप, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, आमदार अमीन पटेल, आमदार साजिद खान, तसेच अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते.

रशीद यांच्या काँग्रेस प्रवेशामुळे जालना शहरातील राजकीय गणित पूर्णपणे बदलू शकते. काँग्रेसला पुन्हा संघटनशक्ती आणि नेतृत्व मिळाले आहे. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) या पक्षांना नवीन आव्हान निर्माण झाले आहे. गोरंट्याल यांचे जुने समर्थक आणि काही नाराज कार्यकर्ते पुन्हा काँग्रेसकडे वळतील, अशी शक्यता राजकीय पातळीवर व्यक्त केली जात आहे.

या प्रसंगी अनेक स्थानिक कार्यकर्ते उपस्थित राहिले - वसंत शिंदे, मुफस्सिर कुरैशी, उमर शेख, शाबाज अंसारी, सुभाष खरात, सैफ अंसारी, सोहेल काजी, आणि इतर काँग्रेसप्रेमी कार्यकर्त्यांनी रशीद यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला.

अब्दुल रशीद यांचा काँग्रेस प्रवेश हा फक्त पक्षांतर नाही, तर जालना शहरातील राजकीय असंतुलन दुरुस्त करणारा टप्पा आहे. त्यांच्या माध्यमातून काँग्रेसला केवळ अल्पसंख्याक समाजातच नव्हे, तर सर्वसामान्य नागरिकांमध्ये पुन्हा स्वीकार्यता मिळण्याची शक्यता आहे. जालना महानगर पालिका निवडणुकीच्या तयारीत ही घडामोड काँग्रेससाठी गेम चेंजर ठरू शकते.




अर्जुन खोतकर यांच्या प्रयत्नांना यश!

# जालना मतदारसंघाला १ कोटी १० लाखांचा तांडा वस्ती सुधार योजनेचा निधी मंजूर

**जालना । प्रतिनिधी -** माजी मंत्री व शिवसेना नेते तथा विद्यमान आमदार अर्जुन खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून जालना मतदारसंघासाठी वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना २०२५-२६ अंतर्गत तब्बल रु १ कोटी १० लाखांचा निधी महाराष्ट्र शासनाने मंजूर केला आहे.

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत १३ ऑक्टोबर २०२५ रोजी जारी झालेल्या शासन निर्णयानुसार जालना जिल्ह्याचा समावेश अर्जुन खोतकर यांच्या पुढाकारामुळे झाला आहे.

**भटक्या व आदिवासी समाजासाठी स्थायिकरणाचा महत्त्वाचा टप्पा**

वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना ही योजना राज्यातील अनुसूचित व भटक्या जमातींना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राबवली जाते. या योजनेअंतर्गत तांड्यांवर रस्ते, पिण्याचे पाणी, वीज, वस्ती सुधारणा व इतर मूलभूत सोयी उपलब्ध करून देण्यात येतात.

अर्जुन खोतकर यांनी सांगितले की, ग्रामीण वस्तीतील भटक्या आणि तांडा समाजाच्या जीवनमानात सुधारणा व्हावी, त्यांना शिक्षण, आरोग्य आणि स्थायिक सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने मी ही मागणी सातत्याने केली. शासनाने ती मान्य करून निधी मंजूर केल्याबद्दल मी राज्य सरकारचे आभार मानतो.



**मंत्रालयात सततचा पाठपुरावा**

या निधीच्या मंजुरीसाठी अर्जुन खोतकर यांनी राज्यातील मंत्री संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेत सतत पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अखेर राज्य शासनाने जालना जिल्ह्यासाठी १ कोटी १० लाखांचा निधी मंजूर केला.

या निधीमुळे जालना विधानसभा मतदारसंघातील वखारी तांडा, बाजीउम्रद तांडा ,पारेगाव तांडा, दांडेगाव तांडा, दहिफळ तांडा, सावंगी तांडा, वडगाव तांडा, जळगाव तांडा, निरखेडा तांडा, पाहेगाव तांडा ,इत्यादी तांडे व मौजपुरी येथील मल्हार वस्ती या ठिकाणी सिमेंट रस्ते, नाली बांधकाम , प्रकाशयोजना आणि आवश्यक नागरी सुविधा उभारल्या जाणार आहेत. त्यामुळे बंजारा,आदिवासी व भटक्या समाजाच्या विकासाला चालना मिळणार आहे.

या निर्णयामुळे जालना मतदारसंघातील तांडा व वस्त्यांच्या विकासाला गती मिळणार असून, हा निर्णय अर्जुन खोतकर यांच्या जनहितवादी आणि विकासाभिमुख भूमिकेचे द्योतक असल्याचे स्थानिक नागरिकांनी नमूद केले.

# वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नाव नोंदविलेल्या विद्यार्थ्यांचा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते गौरव



**जालना । प्रतिनिधी -** इंटरनॅशनल बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये जालना जिल्ह्याचे उत्कृष्ट खेळाडूंनी इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आपल नाव नोंदविला या सर्व खेळाडूंना जिल्हाधिकारी अस्मिता मित्तल यांच्या हस्ते सर्व खेळाडूंचा सत्कार करण्यात आला तसेच ज्यांना स्केटिंग असोसिएशनचे अध्यक्ष अमजद पठाण व नितीन राठोड फाल्कन इंटरनॅशनल स्कूलचे सचिव तथा संचालक मुबाशिरा अनिस सलाट, मुख्याध्यापक श्रीमती नंदनी तसेच शेख अमीर व विष्णू पिंढारकर यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डमध्ये आरिश आमेर अहमद शेख, अलिझा मरियम शेख बशीर, विआन मनोज जिंदल, जयवर्धन नितीन राठोड, जरमिया मनोज कसबे, शिवराज अनिल खतडे, कामरान निसार सय्यद, यश रुपेश बोरुंदिया, वेद अंकुश राठोड यांचा सत्कार करण्यात आला व तसेच या सर्व खेळाडूंना निशा सय्यद यांचे मार्गदर्शन लाभले.

युवा आदर्श

## नेत्र...

मेल्यावरही पाहू जग
सन्मार्ग दिसला छान
नाव नोंदणी आजचं
मरणोत्तर हे नेत्रदान
सोपे सरळ रे सत्कर्म
सुख कुठे या समान
देता आले काही तरी
हा खरा असे सन्मान
दान देतो भीक नाही
याचे मात्र असो भान
सहजच शक्य असे
आपलाचं वाढे मान
भावनेचा खेळ सारा
शरीर आम्हां वाटे धन
गेल्यावर द्यायचे नेत्र
तयार करा जरा मन
बदले कुणाचे जीवन
निर्णय हा नसे सान
खुपकाही केली पापे
आतां होऊ पुण्यवान
आपणास दोन अक्ष
आहो भले भाग्यवान
मरणोत्तर करी दान
होऊ आता गुणवान
दिली दृष्टी छान सृष्टी
सृष्टी रूप आरस्पान
केल्यावरती नेत्रदान
नवे डोळे नवे सपान

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# आंबेगावमध्ये 'विक्टोरियस कार'चे लोकार्पण

## सिनेअभिनेत्री आशु सुरपुर यांच्या हस्ते शुभारंभ

**पुणे । प्रतिनिधी -** आंबेगाव येथील मारुती सुझुकी विक्टोरियस शोरूममध्ये दिवाळीच्या शुभमुहूर्तावर नव्या कारचे भव्य लोकार्पण सोहळा जल्लोषात पार पडला. या सोहळ्याचे उद्घाटन लोकप्रिय सिनेअभिनेत्री आशु सुरपुर आणि सिनेअभिनेता यातीन कारेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास शोरूमचे व्यवस्थापक अभिजीत चव्हाण, सचिन ओमप्रकाश किंगर, किरण घोलप, तसेच चैगुले इंडस्ट्रीजचे मालक उपस्थित होते. लोकार्पण सोहळ्याला स्थानिक नागरिक आणि वाहनप्रेमींची उत्स्फूर्त गर्दी पाहायला मिळाली.

सिनेअभिनेत्री आशु सुरपुर यांनी नव्या कारबद्दल आपले मत व्यक्त करताना सांगितले,ही कार अतिशय आकर्षक असून तिचा लुक आणि परफॉर्मन्स दोन्ही प्रभावी आहेत. जो कोणी नवीन कार घेण्याचा विचार करत आहे,

त्याने 'विक्टोरियस' कार नक्की अनुभवावी. तसेच आंबेगावमधील या शोरूम ला एकदा अवश्य भेट द्यावी, असे त्यांनी सांगितले.दिवाळीच्या आनंदात आणि नव्या कारच्या झगमगाटात पुण्यातील आंबेगाव परिसरात या सोहळ्याने उत्साहाचे नवे वातावरण निर्माण केले.





